Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0018

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत नागपूर शहरातील आदिवासी मुलींच्या वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थीनींचे वस्तीगृह योजनेबाबत अभिमत

प्रा.डॉ.सुनिल कोडापे
सहायोगी प्राध्यापक
बी.पी.एन.आय.एस.डब्ल्यु.
हनुमान नगर, नागपूर—४४००२४
मो.नं. ९४२१७१०८२७
इ. मेल – kodapesunil@gmail.com

**प्रस्तावना -** शिक्षण ही व्यक्तिगत तसेच समाजाच्या स्तरावर जीवनाची गुणवत्ता उंचावणारी एक किल्ली आहे. उत्तम गुणवत्तापूर्ण शिक्षण हे व्यक्तीला व समाजाला गतिमान व मानवी विकासाच्या प्रक्रियेला शक्ती मिळवून देते. व्यक्तीची त्याच्या स्वत:च्या उपजीविकेच्या मिळकतीची क्षमता वाढवते, तसेच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासात भर घालते. सध्या आपण एका गतिमान आर्थिक प्रगतीच्या युगात आहोत. त्यात ‘‘ज्ञान’’ हे प्रगतीच्या प्रवासाचे महत्वाचे साधन आहे. आपल्या प्रचंड मोठया संख्येने असलेल्या युवकांसाठी ही लक्षणीय संधी असतानाच, आपल्या सध्याच्या व नव्याने उद्‌भवणाऱ्या गरजा भागविण्यासाठी उच्च शिक्षणाच्या प्रश्नांवर तातडीने विचार करण्याची गरज आहे. सामान्यत: आपल्या परंपरा व काळाच्या कसोटीवर उतरलेल्या मूल्य व्यवस्था आणि समाजाच्या गरजा, उद्योग व राष्ट्रीय विकासाची प्रक्रीया यासह शिक्षण प्रक्रियेमधील ज्ञान, कौशल्य व मानवविज्ञानाची आखणी, यांच्या पार्श्वभूमीवर होत असणाऱ्या सामाजिक बदलांचे कल्पनाचित्र रेखाटून तयार होणारे प्रश्न, त्यांच्याही यात समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या सध्याच्या व नव्याने निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय शोधून नवीन उपक्रमाच्या व उपक्रमशीलतेच्या चैतन्याचे पोषण करील अशी आपली शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याची व समाजामध्ये मोठया प्रमाणावर बदल घडवून आणण्यासाठी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचीही गरज आहे.

**मुख्य शब्द -** आदिवासी मुली, वस्तीगृह, योजना , अभिमत

बेरोजगारीच्या प्रश्नाच्या संदर्भात, शिक्षण व्यवस्थेने रोजगाराची निर्मिती करावी यावर जास्त भर दिला पाहिजे, परिणामी समाजात खूप मोठी असमानता येईल. आर्थिक वाढ आणि जगाबरोबर वाढत जाणारे परस्पर संबंध या पार्श्वभूमीवर आपल्या तरूणाची तीव्र गतीने वाढणारी महत्वकांक्षा विचारात घ्यावी लागेल. भारतासमोर असणारे उच्च शिक्षणाचे आव्हान हे दूपदरी आहे. त्यापैकी एक म्हणजे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश मिळविणे व समोवश करून घेणे दूसरे म्हणजे गुणवत्ता व श्रेष्ठत्वाच्या परिभाषेत बोलायाचे तर, कौशल्य व संपर्काचे संवर्धन करणे, आपल्या दूरदूष्टीने उच्च शिक्षणाच्या सर्व स्तरावर आपल्या कौशल्य वृद्धीचा पूर्णपणे व आपल्या तरूणांची महत्वकांक्षा या मानवी भांडवलाचा जास्तीत जास्त समावेश करून घेतला पाहिजे. सध्याच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेच्या युगात, आपल्या मोठया संख्येने असलेल्या व बुद्धिवान अशा तरूणांना, आपल्या जागतिक प्रभाव वाढविण्यासाठी प्रगत ज्ञानशाखांमार्फत शिक्षण देण्याची गरज आहे. आधुनिकरणाच्या जगात डोंगर पहाडावर राहणारा आदिवासी समाज आपले आयुष कसे व्यतीत करतो. त्याची शैक्षणिक प्रगती कशी आहे. तो

शिक्षणाच्या प्रवाहात कुठे उभा आहे. विकासाच्या लाटेमध्ये तो वाहूनतर गेला नाही. असे अनेक प्रश्न आज आपल्या समोर उभे आहेत. भारतिय सविधाने सर्व नागरीकांना समान हक्क,समान अधिकार व समान न्याय बहाल केले आहे. या स्वातंत्र्याचा प्रत्यक्ष लाभ आदिवासी जनतेने कीती घेतला हि बघन्याची वेळ आली आहे.

**विषयाचे महत्व :–**

संविधानामध्ये भारतातील अनुसूचीत जाती–जमाती तसेच इतर मागास वर्ग यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हीत संवर्धन करीत आणि सामाजिक अन्याय सर्व प्रकारचे शोषण यापासून भारत सरकार सरंक्षण करील असे भारताच्या संविधानातील अन्याय धोरणाच्या निर्देशक तत्वाच्या बाबद अनुच्छेद ४६ मध्ये नमुद केले आहे. अनुसूचीत जन–जाती व अनुसूचीत क्षेत्रातील रहिवांशांच्या शैक्षणिक समस्या प्रभावीपणे सोडविण्याचा दृष्टीने अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना मोफत निवासाची व भोजनाची सोय करावी, म्हणून शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांनं करिता आश्रमशाळा, वसतीगृह, शिषवृत्ती अशा अनेक योजना शासन स्तरावर सुरू केल्या आहे.

योजनेचा मुख्य हेतु आदिवासींचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास करणे हा असुन आदिवासींची प्रगती, त्यांची बौध्दीक क्षमता वाढविणे आणि आपल्या कौशल्याच्या जोरावर रोजगार प्राप्त करणे हा आहे. आज शासन या योजनांवर लाखो पैसा खर्च करतो आहे. परंतु आजही आदिवासींचा शैक्षणिक विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही. आणि म्हणून शासनाकडुन तयार करण्यात आलेल्या वसतीगृह योजनेत कोणत्या उणिवा, समस्या भेडसावित आहे. त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न शासनस्तरावरून कसा होत आहे याचा शोध घेणे असुन आधुनिकीकरण, जागतीकीकरण यामध्ये कोणत्या नविन समस्यांना आदिवासी विद्यार्थीनींना समोरे जावे लागत आहे हे बघण्यासाठी प्रस्तुत विषयावर सविस्तर माहीती जाणुन त्यावर काही उपाय करता येईल का किंवा शासनाकडे काही शिफारशी करता येईल हे उदेश ठेवुन प्रस्तुत अध्ययन केले आहे.

**महाराष्ट्रातील आदिवासी :**

महाराष्ट्र प्रदेश पूर्वी तीन भागात विभागलेला होता. मुंबई इलाखा, मध्य प्रदेश आणि हैद्राबाद संस्थान. आजचा पश्चिम महाराष्ट्र मुंबई इलाख्यात होता. वऱ्हाडचा काही भाग मध्य प्रदेशात होता तर मराठवाडा निझामाच्या संस्थानात (स्वातंत्र्य प्रापतीनंतर त्याला हैद्रावाद स्टेट म्हणू लागले) होता. १९५६ मध्ये भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आली आणि संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. आदिवासी जमातींची नोंद करून त्यांची पहिली यादी १९५० मध्ये जाहीर करण्यात आली. त्यावेळी असलेली क्षेत्रीय बंधने १९७६ मध्ये उठविण्यात आली. १९७६ नुसार जाहीर केलेली आदिवासी जमातीची यादी उपलब्ध आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकुण लोकसंख्या ११.२३ कोटी इतकी असून. त्यापैकी आदिवासींची लोकसंख्या १०५.१० लक्ष इतकी आहे. ही राज्याच्या लोकसंख्येच्या ९.८ टक्के इतकी आहे. महाराष्ट्रातील जमातीचे यादीत एकूण ४५ आदिवासी जमातीचा समावेश असून, त्यातील प्रमुख जमाती भिल्ल, महादेव, परधान, डोंगर कोळी, राजगोंड, वारली, कोकणा, ठाकुर, ठाकर, काथोडी कोळी, मल्हार, आंध, कोरकूं धारणा हया आहेत.

समाजातील कमकूवत घटकांपैकी आदिवासी घटक अत्यंत दुर्बल असून, भारतीय घटनेच्या कलम ४६ खाली समाजाच्या दुर्बल घटकांच्या आणि विशेषत:अनुसूचित जाती, जमाती शैक्षणिक,

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0018

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

सामाजिक व आर्थिक हितसंबंधाकडे विशेष लक्ष देऊन त्यांचा विकास करण्याकरिता आणि त्यांना सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून संरक्षण देण्यास शासन कटीबध्द आहे. त्याप्रमाणे आदिवासी क्षेत्राचा तसेच या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्र शासनाने केलेल्या सूचना व मार्गदर्शन तत्वे यानुसार राज्य शासनाने आदिवासींसाठी एक स्वतंत्र जनजाती क्षेत्र उपयोजना सन १९७५—७६ मध्ये तयार केली व त्याची अंमलबजावणी १ एप्रिल १९७६ पासून सुरू केली. या आदिवासी उपयोजनेमध्ये महाराष्ट्रातील १५ जिल्हयातील ६७ तालुक्यांमध्ये ६,९६२ गावे व १२ शहरे यांचा समावेश आहे. त्याशिवाय आदिवासी लोकसंख्या असलेल्या लहान लहान भागांची नोंद करून ज्या गावात ५० टक्क्यांहून अधिक आदिवासी लोकसंख्या आहे अशा गावांचा समूह तयार करून त्या समुहातील आदिवासींचा विकास करण्याच्या दृष्टीने ४३ सुधारित क्षेत्र विकास गट (माडा) व २४ लघु सुधारित क्षेत्र विकास गट (मिनीमाडा) केंद्र शासनाच्या संमतीने मंजूर करण्यात आले.

**आदिवासींची शैक्षणिक स्थिती :—**

आदिवासी भागात गेल्या अनेक वर्षात शासन व अनेक सामाजिक संस्था आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहेत. तरी देखील आदिवासी क्षेत्रामध्ये शिक्षणाला पूरेसा वेग येतांना दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आदिवासी लोकांची शिक्षणाबद्दलची उदासिनता व अज्ञान हे होय. त्याचप्रमाणे आदिवासींचे दारिद्रय सुद्धा या शिक्षण प्रणालीला अडसर येत आहे. अर्थाजनामध्ये आदिवासींची लहान मुले सुद्धा सहभागी होऊन कुटुंबाला हातभार लावतांना दिसुन येते. त्याचबरोबर आदिवासींचे सामाजिक जीवन त्यांची संस्कृती ही सुद्धा शिक्षणामध्ये आड येतांना दिसून येते. त्यांच्यातील अज्ञान, भिती, अंधश्रद्धा त्याच बरोबर आदिवासींचे शिक्षण आणि भाषा ही एक मोठी समस्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते. आदिवासी बोलीभाषेचा प्रश्न शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. महाराष्ट्रातील जमाती निरनिराळया बोलीभाषा बोलतात त्यात काही मराठी बोलीभाषा आहेत तर काही स्वतंत्र्य आहेत. भाषेच्या अडचणीमुळे विकास कार्यात विचाराची देवाण—घेवाण करण्यात काही अडचणी निर्माण होतात. हया सर्व कारणांमुळे आदिवासींचा शैक्षणिक दर्जा पाहिजे तेवढया प्रमाणात विकसित झालेला नाही. हे त्यांच्या साक्षरतेच्या प्रमाणावरून दिसून येते.

**अनुसूचीत जमाती आणि इतर प्रवर्गात साक्षरता दर:—**

| वर्ष | अनुसूचित जमाती | | | सर्व सामाजिक समूह | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | महिला | एकुण | पुरूष | महिला | एकुण |
| १९६१ | १३.८३ | ३.१६ | ८.५३ | ४०.४० | १५.३५ | २८.३० |
| १९७१ | १७.६३ | ४.८५ | ११.३० | ४५.९६ | २१.९७ | ३४.४५ |
| १९८१ | २४.५२ | ८.०४ | १६.३५ | ५६.३८ | २९.७६ | ४३.५७ |
| १९९१ | ४०.६५ | १८.१९ | २९.६० | ६४.१३ | ३९.२९ | ५२.२१ |
| २००१ | ५९.१७ | ३४.७६ | ४७.१० | ७५.२६ | ५३.६७ | ६४.८४ |
| २०११ | ६८.५० | ४९.४० | ५९.०० | ८०.९० | ६४.६० | ७३.०० |

**शासकीय वसतीगृहे :—**

राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांची तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी आणि त्यांना माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर वसतीगृहे सुरू करण्यात आलेली आहेत. या वसतिगृहातून मोफत भोजन व राहण्याची सोय केली जाते. तसेच इतर सर्व सवलती दिल्या जातात. या विभागाकडून सन

२०१४—२०१५ या वर्षापर्यंत ४०० वसतिगृहे चालविण्यात येत असून, त्यापैकी २७९ वसतिगृहे खास मुलींसाठी व उर्वरित २८३ वसतिगृहे मुलांसाठी आहेत. जिल्हा व तालुका स्तरावरील वसतिगृहात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १० टक्के, कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के आणि उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ६५ टक्के प्रमाणात प्रवेश दिला जातो. तसेच विभागीय स्तरावरील वसतिगृहात कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २० टक्के आणि उच्च महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ८० टक्के या प्रमाणात प्रवेश देण्यात येतो. या विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या ४९० वसतिगृहातून एकूण ५५५०६ प्रवेशीत विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत.

**अध्ययनाचे उद्देश :—**

१) विद्यार्थ्यीनीची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती जाणून घेणे.
२) वसतीगृहातविद्यार्थ्यीनीना शासनाकडुन उपलब्ध होत असलेल्या सेवा व सुविधा जाणून घेणे.
३) विद्यार्थ्यीनींना वसतीगृहात येणा—या समस्या जाणुन घेणे.
४) समस्येसंदर्भात विद्यार्थ्यांच्या शासनाकडुन असलेल्या अपेक्षा जाणून घेणे.

**गृहितकृत्ये (उपकल्पना) :—**

१. वसतीगृहातील विद्यार्थीनीची वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभुमी सुदृढ नाहीत
२. वसतीगृहातील विद्यार्थीनींना शासनाकडून अल्प प्रमाणात सेवा व सुविधा पुरविल्या जात आहे.
३. वसतीगृहातील मुलींना आर्थिक, शैक्षणिक व इतर समस्या अधिक प्रमाणात आहे.
४. वसतीगृहातील विद्यार्थीच्या शासनाकडुन सेवा सुविधेबाबत मोठयाप्रमाणात अपेक्षा आहे.

**संशोधन आराखडा :—**

संशोधनाचा उद्देश लक्षात घेवुन संशोधन आराखडा निश्चित करण्यात आला. आदिवासींच्या शैक्षणिक करीता शासनाच्या विविध योजना राबविल्या जात आहे. त्यामध्ये समुह आश्रमशाळा,आश्रमशाळा,एकलव्य नवोदय विद्यालय तर तालुका आणि जिल्हा पातळीवर वस्तीगृह योजना इत्यादी संशोधनातुन वस्तीगृह योजनेबाबत विद्यार्थीनीचे सविस्तर अभिमत जाणुन घ्यावयाचे असल्याने त्याकरीता अन्वेषनात्मक व निधानात्मक संशोधन आराखडा घेण्यात आला. प्रस्तुत विषयाला अनुसरून आवश्यक माहिती मिळण्या करिता नागपूर शहरातील आदिवासी मुलींचे वस्तीगृह जाणुन घेण्यात आले. एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प नागपूर अंतर्गत कार्यरत असलेल्या चार आदिवासी वस्तीगृहाची माहिती प्राप्त करण्यात आली. एकुण चार वस्तीगृहातील प्रत्येकी ५० विद्यार्थिनी प्रथम प्रादान्य कमाने घेण्यात आल्या आहेत त्यामध्ये पदवी,पदयुत्तर,व्यावसायिक अश्या विविध वर्गवारतील विद्यार्थीनीचे चयन केले आहे. आवश्यक माहीती ही वैयक्तीक व समुह चर्चेतुन प्राप्त केली आहे.

**प्रमुख निष्कर्ष :—**

प्रस्तुत संशोधनाचा विषय शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह नागपूर, येथे राहत असलेल्या मुलींच्या वसतीगृह योजने बाबत अभिमत असा असुन वसतीगृहात मुलींना शासनातर्फे कोणत्या सोयी सुविधा पुरविल्या जातात हे जाणून घ्यायचे होते तसेच वसतीगृहातील मुलींना कोणत्या समस्या येतात

त्या समस्या मुली कशा सोडवितात. समस्या सोडवितांना त्यांना येणा—या अडचणी तसेच शासनाकडुन त्यांच्या काय अपेक्षा आहे. हे प्रस्तुत संशोधनातुन जाणून घेण्यात आले.

१. उपरोक्त अध्ययनात ५६ टक्के विद्यार्थीनी पदवी शिक्षण घेणा—या असुन ९३ टक्के विद्यार्थीनी मराठी मातृभाषीक आहेत. ७४ टक्के विद्यार्थीनी हया संयुक्त कुटूंबात राहत असुन त्यांच्या कुटुंबामध्ये ४ ते ६ सदस्य कुटुंबसंख्या आहे. ६३ टक्के विद्यार्थीच्या कुटुंबात माघ्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण घेतलेले सदस्य आहे. तर ९२ टक्के मुलींच्या कुटुंबाचा व्यवसाय मजुरी आहे. आणि ६६ टक्के विद्यार्थीनीच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ ते १.५ लाख च्या दरम्यान असुन त्यांच्या निवासाकरीता मातीचे घर आहे.

२. उपरोक्त अध्ययनात ८५ टक्के विद्यार्थिनीची वस्तीगृहातील निवास व्यवस्था रूम नुसार केलेली आहे. ९८ टक्के विद्यार्थीनीच्या मतानुसार जेवणाची व्यवस्था मेसव्दारे केली जाते. तर ६१ टक्के विद्यार्थीनी हया रूम मध्ये बसुनच भोजन करतात. ७९ टक्के विद्यार्थीनीनुसार विद्यार्थीनी व वसतीगृहातील कर्मचारी यांचे आपसात चांगले संबंध आहे. मुलींना पिण्याच्या पाण्यासाठी फिल्टर पाण्याची व्यवस्था केली आहे. असे ५१ टक्के विद्यार्थीच्या मते दिसुन येते. वसतीगृहात सफाईचे काम करण्यासाठी सफाईगाराची व्यवस्था केली आहे. असे ९७ टक्के विद्यार्थीनी सांगतात. वसतीगृहातील विद्यार्थीनी आपल्या आरोग्याची तपासणी शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडुन करून घेतात.

३. उपरोक्त अध्ययनात ६९ टक्के विद्यार्थीनीच्या मते विद्यार्थीनां वसतीगृहात प्रवेश घेतांना अडचणी येतात. वसतीगृहात स्वच्छतेविषयी सर्वसाधारण समस्या दिसुन येते असे ५७ टक्के विद्यार्थीनी आपले मत व्यक्त करतात. वसतीगृहात संगणकाचे पुरेपुर व्यवस्था केलीली नाही. विद्यार्थीनीना वसतीगृहात मनोरंजनासाठी केवळ टि.व्ही चा उपयोग केला जातो. तर ५६ टक्के विद्यार्थीनीच्या मते विद्यार्थीनीना वेळेवर निर्वाह भत्ता दिला जात नाही.

४. प्रस्तुत अध्ययनामध्ये ७० टक्के विद्यार्थीनी वसतीगृहात प्रवेश घेतांना विद्यार्थीनीला लवकरात लवकर वसतीगृहात प्रवेश मिळाला पाहिजे. तर ७६ टक्के विद्यार्थीनीच्या भोजनात हिरवे पाल्यभाज्या तसेच पोष्टीक आहार अशा प्रकारे समतोल आहार देण्यात यावा अशा अपेक्षा शासनाकडून बाळगतात. त्याचबरोबर विद्यार्थीनीना वेळेवर पुस्तके उपलब्ध करून द्यावे तसेच संगणक आणि संगणक प्रशिक्षण वसतीगृहातील विद्यार्थीनां उपलब्ध करून द्यावे अशी अपेक्षा शासनाकडुन बाळगतात.

५. अध्ययनामध्ये १०० टक्के विद्यार्थीनीच्यामते प्रत्येक वसतीगृहात एक स्वतंत्र ग्रंथालय स्पर्धा परिक्षा पुस्तकासह उपल्बध असाव आणि विविध स्पर्धा परिक्षा मार्गदशन विद्यार्थीनीना मिळाव अशी शासनाकडुन अपेक्षा बगाळगतात.

**सुचना व शिफारशी**

१. शासकिय मुलीचे वस्तीगृह करीता शासनाने स्वताच्या मालकीची इमारत उपल्बध करून दयावी व इमारतीमध्ये प्रत्येक मुलींकरीता आवश्यक जागा सर्व सोयी सुविधा युक्त उपल्बध करून दयावे.

२. इमारतीमध्ये एक संघणक लॅब इन्टरनेटसह उपल्बध करून दयावी व प्रत्येक विद्यार्थीनिना आवश्यक संघणक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

३. इमारतीची स्वच्छता राखण्यासाठी शासनाने सफाईगार व नाईट वॉचमनची स्थायी नियुक्ती करावी.

४. वसतीगृहातील विद्यार्थीनीची महीण्यातुन एकदा आरोग्याची तपासणी करीता शासकीय वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करावी.

५. वसतीगृहात विद्यार्थीनीचा प्रवेश महाविद्यालयाचे सत्र सुरू झाल्यानंतर लगेच करण्यात यावे त्यामुळे विद्यार्थीनीला महाविद्यालयात नियमित हजर रहाता येईल उशीरा प्रवेश मिळाल्यामुळे आणि निवासाची व्यवस्था अभावी विद्यार्थीनीना सुरूवातीच्या शैक्षणिकार्यापासुन वंचित रहावे लागते.

६. प्रत्येक वसतीगृहात एक स्वतंत्र ग्रंथालय स्पर्धा परिक्षा पुस्तकासह उपल्ब्ध असाव आणि विविध स्पर्धा परिक्षा व रोजगार मार्गदशन विद्यार्थीनीना प्राप्त करून देण्याची व्यवस्था करावी.

**संदर्भ :**

उराव कार्तिक (२०११) आदिवासी हिन्दु नही है! बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

कुमरे मन्सराम (२००७) प्रधान आदिवासी सभ्यता,जय सेवा प्रकाशन, नागपूर.

गुप्ता रेणूका (२००८) आदिवासी विकास से विस्थापन, राधा प्रकाशन प्रा. लि. नवी दिल्ली

घाटोळे रा.ना. (२००८) समाज शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती,मंगेश प्रकाशन, नागपूर.

डॉ. गारे जी. एम. (१९९८) महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, अमृत प्रकाशन, औरंगाबाद

डॉ. गारे जी. एम. (१९९७) आदिवासींचे शिक्षण, संकेत प्रकाशन, औरंगाबाद.

डॉ. गारे जी. एम. (१९७६) आदिवासी: समाज आणि संस्कृती आदिवासी साहित्य, पुणे.

डॉ. गारे जी. एम. (२००१) आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगवा प्रकाशन, पुणे.

दिवेकर एम. के (२००८) आदिवासी जमिनी विषयक कायदे, मुकुंदप्रकाशन, ठाणे.

डॉ. धर्माधिकारी (२०८६) शिक्षकाचा धर्म, श्री विद्या प्रकाशन, पुणे.

मराठे कालिदास बा.(१९०८) शालेय पातळीवर गुणवत्तेचे मानांकन. अभिनव बुक डेपो, कोल्हापूर.

डॉ. मांडवकर भाऊ (१९९७) आदिवासी, सेवा प्रकाशन, अमरावती.

डॉ. मुनघाटे प्रमोद (२००७) आदिवासी मराठी साहित्य: स्वरूप आणि समस्या,अरूण पारगावकर, पुणे.

वसावे एस. व्हि. (१९९६) नहार कंद, मानव मुक्ती ट्रस्ट, पुणे.

डॉ. शर्मा ब्रहादेव (१९९९) आदिवासी विकास एक सैद्धान्तिक विवेचन, मध्यप्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी, भोपाल.